# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

**दिनांक २८.०८.२०२६ शुक्रवार**

**१) बनावट सोन्याचे तारणावर कोटयावधींचे गोल्ड लोन : ऑडीटमधुन उघडकीस आले मोठे आर्थिक व्यवहार, आर्थिक गुन्हेशाखा, नागपुर शहर पोलीसांकडुन पर्दाफाश.**

ICICI बॅकेच्या गोल्ड लोन प्रक्रियेमध्ये अनियमितता करून बनावट कर्जदारांच्या नावाने गोल्ड लोन मंजुर करणे, तारण ठेवलेल्या सोन्याचा शुध्दता व वजनाबाबत गैरप्रकार करणे तसेच कर्जाच्या रकमांचा गैरवापर केल्याचे गंभीर प्रकरण नागपुर शहर पोलीसांच्या तपासात समोर आले आहे.

या प्रकरणी पोलीस ठाणे धंतोली येथे दिनांक ३०/३/२०२६ रोजी अप. क्रमांक ६३/२०२६ दाखल करण्यात आला होता. दिलेल्या तक्रारीनुसार बॅकेचे रू. २३,१९,४१,७५१/– इतके आर्थिक नुकसान झाल्याचे नमुद करण्यात आले होते.

बॅकेच्या ऑडिटमधुन लागला गैरव्यवहाराचा सुगावा:– सदर प्रकरणाचा तपास सुरू होण्यापुर्वी संबधीत बॅकेकडुन गोल्ड लोन खात्यांचे नियतकालिक ऑडिट करण्यात येत होते. दिनांक १८/१०/२०२५ रोजी गोल्ड लोन ऑडिटदरम्यान संबधीत ऑडीटरच्या निदर्शनास एका गोल्ड लोन खात्यात तारण ठेवलेल्या सोन्याचा दागिन्यांबाबत संशयास्पद बाब आढळुन आली. त्यांनतर याप्रकरणाची व्याप्ती तपासण्यासाठी संबधीत शाखेतील गोल्ड लोन खात्यांची सखोल तपासणी करण्यात आली. पुढे नागपुर शहरातील विविध शाखांमधील गोल्ड लोन खात्यांचे ही ऑडिट करण्यात आले.

**एका खात्यापासुन तपास पोहोचला १५२ खात्यांपर्यंत** :

तपासादरम्यान विविध शाखांमधील गोल्ड लोन खात्यांची छानणी करण्यात आली मनिष नगर, मेडीकल चौक, नरसाळा, काटोल रोड, अजनी चौक, छत्रपती चौक, वर्धा रोड, प्रतापनगर, व नंदनवन या शाखांमधील संबधीत कर्ज व्यवहार तपासण्यात आले. प्रत्येक खात्यामागे कर्ज कोणाचे नावाने मंजुर झाले, तारण काय दाखविण्यात आले, कर्जाची रक्कम कोठे जमा झाली, आणि त्यांनतर ती रक्कम कोठे वळविण्यात आली याचा स्वतंत्रपणे मागोवा घेण्यात आला.

**मनी ट्रेल वर आर्थिक गुन्हे शाखेचा पोलीसांचा फोकस :**

या तपासातील सर्वात महत्वाचा भाग म्हणजे कर्जाचा रकमांचा आर्थिक प्रवास, गोल्ड लोन मंजुर झाल्यांनतर संबधीत रक्कम कोणत्या खात्यात जमा झाली त्या खात्यातुन पुढे कोणत्या खात्यामध्ये व्यवहार करण्यात आले आणि या व्यवहारांचा आरोपीशी काय संबध आहे यासाठी पोलीसांनी विविध बॅकांकडुन स्टेटमेन्ट प्राप्त केले व फसवणुकीची रक्कम नेमकी कोठे गेली हा तपासाचा महत्वाचा केंद्रबिदु बनला. याप्रकरणात बॅकेची सुमारे २३,३१,८४,७५२/ रू आर्थिक फसवणुक झाल्याचे समोर आले आहे.

**<u>मोबाईल/सिडीआर चे माध्यमातुन तपास</u>**:

आर्थिक व्यवहारासोबतच संशयीत व्यक्तींचा मोबाईल क्रमांकाचे सिडीआर प्राप्त करून तपासाण्यात आले आरोपी व संबधीत व्यक्तीमधील संपर्क व्यवहाराचा काळातील परस्पर संपर्क, आणि त्यांचा भुमिकेबाबत उपलब्ध माहीतीची पडताळणी करण्यात आली. यामुळे केवळ कागदपत्रावर आधारीत तपास न करता आर्थिक व्यवहार व संपर्काचे पुरावे बॅक रेकॉर्ड अशा तिन्ही बाजुंनी तपास पुढे नेण्यात आला.

**<u>घरझडतीत मिळाले महत्वाचे पुरावे</u>**:

तपास तथकांने आरोपीचा घराची झडती घेतली या कारवाई मध्ये मोबाईल फोन, लॅपटॉप, बनावट गोल्ड लोन कर्जदांराचे यादया, वाहने तसेच बॅक व्यवहाराचे संबधीत महत्वाचे कागदपत्रे जप्त करण्यात आली. विशेषत: बनावट गोल्ड लोन कर्जदारांची यादी मिळाल्याने महत्वाची तपासामध्ये दिशा मिळाली.

**<u>बॅकेतील अधिकारी /व्हॅल्युअर व ऑडीटरची चौकशी :</u>**

पोलीसांनी या प्रकरणात केवळ कर्जदारांपुरता तपास मर्यादीत न ठेवता गोल्ड लोन मंजुरी प्रक्रियेशी संबधीत व्यक्तींची भुमीका तपासली. शाखा व्यवस्थापक व्हॅल्युअर/ऑडीटर गोल्ड लोन विभागातील संबधीत कर्मचारी यांचे बयाण नोंदविण्यात आले. गोल्ड लोन मंजुर करतांना कोणती प्रक्रिया पाळली गेली, तारणांचे मुल्यांकन कसे झाले आणि ऑडीट मध्ये काय निष्पन्न झाले याची पडताळणी करण्यात आली.

**<u>ऑडीट मधुन समोर आले गंभीर प्रश्न :</u>**

तपासादरम्यान संबधीत गोल्ड लोन खात्यांचे ऑडीट करण्यात आले. तसेच अनेक खात्यांमध्ये तारण म्हणुन दाखविण्यात आलेल्या सोन्याबाबत गंभीर अनियमता आढळल्या. यामुळे पोलीसांनी कर्ज मंजुर कसे झाले आणि तारणांचे मुल्यांकन नेमके कसे झाले या दोन महत्वाचा प्रश्नांवर तपास केंद्रित केला.

**<u>एका पाठोपाठ एक अटक :</u>**

तपासातील कागदपत्रे, बॅक व्यवहार, बयाण, ऑडीट रिपोर्ट आणि इतर पुराव्यांची पडताळणी केल्यांनतर पोलीसांनी कारवाईचा वेग वाढविला. या प्रकरणात आतापर्यत ०७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यामध्ये बॅकेशी संबंधीत पदांवर कार्यरत असलेल्या व्यक्तींचाही समावेश आहे. अटक केलेल्या आरोपींच्या भुमीकेची स्वतंत्रपणे पडताळणी करून त्यांचेकडुन मिळालेली माहीती इतर पुराव्यांशी तपासली जात आहे.

**<u>तपास :</u>**

पोलीसांची कारवाई केवळ आरोपींचा अटकेपुर्ती मर्यादीत नसुन फसवणुकीचे संपुर्ण रक्कम, बनावट कर्जदांराचे भुमीका व या प्रकरणातील संपुर्ण नेटवर्क शोधण्यावर तपास यंत्रणेचा भर आहे. तपासादरम्यान आणखी व्यक्तींचा भुमीका निष्पन्न झाल्यास त्यांचेविरूध्द सुध्दा कारवाई करण्यात येणार आहे.

**<u>गुन्हा करण्यासाठी आरोपीतांनी वापरलेली पध्दत</u>**:

''गोल्ड लोन प्रकरणांचा ऑडीट दरम्यान काही तारण सोन्याचा शुध्दतेबाबत संशयास्पद बाबी निर्दशनास आल्यानंतर पोलीसांनी या प्रकणांचा सखोल तपास सुरू केला. तपासादरम्यान विविध शाखांमधील १५२ गोल्ड लोन खात्यांची छानणी करण्यात आली असुन बॅक रेकॉर्ड, ऑडीट अहवाल, केवायसी कागदपत्रे, सिसिटीव्ही फुटेज, मोबाईल सिडीआर तसेच आर्थिक व्यवहरांची माहीती तपासण्यात आली आहे. या तपासातुन मोठया आर्थिक गैरव्यवहाराचे धागेदोरे समोर आले असुन आजपर्यंत ८ आरोपींचा सापळा रचुन अटक करण्यात आली आहे.''

**<u>मुख्य आरोपी सचिन राउत याची फसवणुकीची पध्दत</u>**:

सन २०१८ ते २०१९ मध्ये याने ICICI बॅकेमध्ये स्वतांचे नावे गोल्ड लोन केले. त्यांनतर बॅकेमध्ये स्वत:ची क्रेडीट वाढविली. त्यांनतर बॅक मॅनेजर यांना दिलेले गोल्ड लोनचे टारगेट हे पुर्ण करायचे होते. त्यामुळे सचिन राउत हा भंगारचा व्यवसाय करत होता. त्याचा लेबरचा नावाने बॅक मॅनेजरचा माध्यमातुन गोल्ड लोन करण्यात आले त्यांनतर बॅक मॅनेजर पंकज केकतपुरे, दिनेश नागपुरे, आशिष वंजारी, उप व्यवस्थापक प्रकाश अवस्थी यांनी मुख्य आरोपी सचिन राउत यांना गोल्ड लोन देण्यासाठी विविध शाखेमधुन असलेले मॅनेजर यांनी मदत केली आहे.

अप्रेझर/व्हॅल्युअर नंदु खरवडे यांची नियुक्ती ही आयसीआयसीआय बॅकेच्या ४ शाखेत नियुक्त असतानाही त्याला इतर शाखेत पाठवुन बनावट गोल्ड चे व्हॅल्युशन करण्यात आले आहे. अप्रेझर/व्हॅल्युअर नंदु खरवडे यांनी एकुण १५५ बनावट सोन्याचा दागिन्याचे व्हॅल्युवेशन केले आहे. त्यामोबदल्यात नंदु खरवडे यास प्रत्येक अहवाल देण्यासाठी यास ५०००/ रू. हे पंकज केकतपुरे हा देत होता. नंदु खरवडे यांनी आपले ओळखीचे, मित्र, नातेवाईक असे एकुण ३८ बनावट गोल्ड लोन ग्राहक बॅकेला दिलेले आहेत. गोल्ड लोन प्रकिया पुर्ण झाल्यावर ऑडीटर यांचेकडुन ३ महिन्यानंतर ऑडीट होत असते त्यात प्रमोद टेटे, राजेंद्र शिलनकर, धनंजय ढोमने तिघेही ऑडीटर असुन यांना बनावट सोन्याचे दागिने हे शुध्द सोन्याचे आहे असा अहवाल देण्यास सांगुन त्यामोबदल्यात त्यांना पैसे देण्यात आले. अशा प्रकारे बॅकेतील सर्व यंत्रणेने बनावट ग्राहक यांना तयार करुन फौजदारी कट करुन गुन्हा केला आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**